मार्च २००४

# सहकारचे नवीन वर्ष चालू होत आहे ( १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५)

एक एप्रिल २००४ ही तारीख पतसंस्थांच्या कामकाजाला नव्या उमेदीने,उत्साहाने, संकल्पनेने सुरुवात करण्याची वेळ आहे हा दिवस वाया घालवयाचा नाही,याचा निश्चय आजच करु या.

असे समजूया की,आजच १एप्रिल आहे. गुरुवारचा शुभदिन आहे सणासुदीचा दिवस जसा आपल्याला मिणमिणतो, तसाच हा दिवस आहे. तणावरहित, मांगल्यमय व आंनदीमय वातावराणाने कसे वेढून टाकले आहे. त्यात सहकार चळवळीची शताब्दी सुध्दा ह्याच वर्षात संकल्प सोडण्यासाठी चांगला मुहूर्त. सर्व संचालक, सेवक एकत्र आलेत. सभा नव्हे Get togather आहेत.संकल्पसिध्दी साठी चर्चा :-

१) आपल्या पतसंस्थेमध्ये एकूण थकबाकीदारांची संख्या किती ?

२) त्यांची थकीत रक्कम किती ? मुद्दल + व्याज + दंडव्याज व इतर.

३) सवी थकबाकीदारांना (जामीनदारांसहीत ) घरच्या, नोकरीच्या, व्यवसायाच्या व गावच्या पत्त्यावर थकीत रक्कम भरण्यासाठी १५ दिवसांची नोटीस (१ली नोटीस)

४) २ दिवसानंतर राहिलेलेल्या रकमेसाठी पुन्हा वरील प्रमाणे नोटीस ( २ रे नोटीस)

५) दुसऱ्या नोटीसची मुदत संपल्यानंतर ५ दिवसांची अंतिम वरील ३ प्रमाणेच नोटीस (३री व अंतिम नोटीस)

(टिप :- वरील तीनही नोटीस देण्यासाठी पतसंस्थेच्या लेटरहेडवर / नोटीसवर शिक्का मारुन ठरलेल्या साच्यात/वाक्यरचनेत स्वत: पतसंस्थेनेच नोटीस पाठवाव्यात. ह्या साठी '' वकीलाची नोटीस पाठविण्याची आवश्यकता नाही '')

६) अंतिम नोटीसची मुदत संपल्यानंतर ५ दिवसांनी, थकबाकीदारांवर (जामीनदारांसहीत)महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १०१ नुसार ठरलेल्या साच्यात प्रकरणे बनविण्यास सुरवात करावी.संचालक मंडळाच्या ठरावासहित २० दिवसात सर्व १०१ प्रकरणे संबंधित सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांकडे ३ टक्के रकमेचे चलन भरुन प्रत्यक्ष रक्कम अदा करुन दाखल करावी.

(टिप :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ९१ नुसार ' सहकार न्यायालयात' उचित निर्णयासाठीच ही प्रकरणे दाखल करावीत. त्यासाठी सहकारी कायद्याचे वरील ९१ व १०१कलमे स्वत: वाचावीत.)

७) थकीत रक्कम वसुल करणेसाठी दाखल केलेले दावे व त्यांची सुनावणी होणे साठी संबंधीतांकडे पाठपुरावा स्वत: करावा. व सुनावणीच्या १ ल्या तारखेची नोटीस कर्जदार व जामीनदार यांना संबंधीतांनी पाठविली की नाही ह्याची खात्री करुन घ्यावी.

८) सुनावणीच्या १ ल्या तारखरेस नोटीशीतील वेळेप्रमाणे पतसंस्थेंच्या जाणकार व जबाबदार पदाधिकारी किंवा संचालक किंवा अधिकारी किंवा अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीने स्वत:वेळेत शेवटपर्यंत हजर रहावे.हजेरीची सही करावी व तारीख टाकवी व पुढील तारीख व वेळ लक्षात ठेवावी.

९)	दुसऱ्या तारखेस ठरलेल्या वेळेत वरील ६ प्रमाणे हजर रहावे. मागील तारखेस काही कागदपत्रे मागितली असतील तर ती संबंधीतांना नियमाप्रमाणे द्यावीत आणि किंवा काही Documentsचे Verificationमागितले असेल तर तेही करुन द्यावे. हजेरीची सही करावी.
(टीप:– ह्या साठी अधिनियम ३२ व नियम २७ स्वत: वाचावे.)

१०)	३ ऱ्या तारखेस ठरलेल्या वेळेत वरील ६ प्रमाणे हजर रहावे. कर्जदार व जामीनदार येवोत अगर न येवोत, सुनावणी संपण्यासाठी व योग्य तो निकाल देण्यासाठी आपले म्हणणे ठामपणे मांडावे हजेरीची सही करावी.

११)	नैसर्गिक न्यायाच्या नियमानुसार कर्जदार व जामिनदारांना संधी दिल्यानंतरच पतसंस्थेने न्यायाची अपेक्षा करावी.

(टीप :– सर्वसाधारणपणे ३ महिन्यांच्या कालावधीत १०१ कलमाखाली दाखल केलेल्या दाव्याचा निकाल देण्याची रित राज्यभर कार्यरत आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत व कालवधीत थोडा वाढू शकतो.पण त्यासाठी जागरुक असलेच पाहिजे.)

१२)	एकदा १०१ चे ॲवार्ड मिळाले की व पतसंस्थेचा थकबाकी वसुलीचा फार महत्वाचा टप्पा संपला अशी परिस्थीती निर्माण होते.

१३)	ॲवार्ड मिळाल्यानंतर, त्याची अंमलबजावणी करण्याचे काम विशेष कर्ज वसुली अधिकारी (SRO) करत असतात.म्हणून SRO मिळविणेसाठी माहारष्ट्र शासन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,पतसंस्थाचे फेडरेशन ह्यांचेकडे जाण्याचा अधिकार आपोआप तयार होतो. अनेक पतसंस्था स्वत:च्या कर्मचाऱ्यांना SRO चे अधिकार घेतात. SRO संबधी समस्या उभी राहू शकते.त्या त्या स्तरावर अनेक अडचणी तयार होतात.परंतु काळजी करण्याचे कारण नाही.पाठपुरावा व चिकाटी हेच त्याचे उत्तर आहे. शिवाय मी केव्हाही 9820280666 ह्यावर उपलब्ध आहे.प्रश्न निश्चित सुटण्यास मदत होईल.

१ एप्रील ह्या दिवशी व दिवसापासून हे ठरविणे आवश्यक आहे. नवीन कर्ज हे उपविधी, सहकार कायदा व संचालक मंडळाच्या प्रत्यक्ष मंजुरीनुसारच द्यायचे.रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, फोटो कर्जाचे कारण, पुढील तारखेचे धनादेश, कर्ज परतफेडीची क्षमता, इत्यादी बघनूच कर्ज मंजूर करून सर्व कागद पत्रांची पूर्तता करुन घेऊनच धनादेशाद्वारे वितरण करावे.

दरम्यानच्या कालावधीत अन्य ज्या अनुषंगीक बाबी आहेत, त्या करणे क्रमप्राप्त आहेच.त्यांचा उहापोह आपण यथावकाश करणार आहोतच.

१ एप्रील २००४ ते ३१ मार्च २००५ हे आपल्या पतसंस्थेचे आर्थिक वर्ष नवीन कुठल्याही थकबाकीशिवाय व जुनी थकबाकी वसुल करण्याच्या आपल्या कामास शुभेच्छा !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**